# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे शाखा

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-४८३/२०२२ दिनांक :- १३/०४/२०२२.

**Credit Card Reward Point जमा करण्याचे सांगुन लिंक पाठवुन त्याद्वारे फसवणुक झालेली ७०,८१७/- रुपयाची रक्कम तक्रारदाराला परत - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी**

दिनांक २३/०३/२०२२ रोजी सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार नामे श्री. सचिन राय रा. ई/०३ वसंत रिजेन्सी, दिवाणमान वसई प. यांना क्रेडिट कार्ड कस्टमर केअर मधुन बोलत आहे असे सांगुन अनोळखी व्यक्तीने मो.क्र.७४७९३६१६०६ यावरुन फोन करुन तक्रारदार यांचेकडील क्रेडिट कार्डावरील Reward Point जमा करावयाचे आहे असे सांगितले. सदर Reward Point जमा करण्याकरीता तक्रारदार यांना त्यांचे मोबाईलवर आलेल्या लिंकवर क्लिक करण्यास सांगितले. तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर आलेल्या लिंकवर क्लिक केले असता त्यांचे क्रेडिट कार्डमधुन ७०,८१७/- रु कपात झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला. त्यावेळी तक्रारदार यांची बनावट क्रेडिट कार्ड कस्टमर केअरच्या व्यक्तीकडुन फसवणूक झाल्याची निदर्शनास आलेने त्यांनी तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे दिला.

सदरची तक्रार प्राप्त होताच सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ कारवाई करीत क्रेडिट कार्डच्या ट्रान्झॅक्शनचे अवलोकन केले असता सदरची रक्कम ही 99 acrees Edge I या गेटवेद्वारे गेल्याचे दिसुन आल्याने सायबर गुन्हे कक्ष यांचे निर्देशावरुन 99 acrees Edge I कंपनीसोबत तक्रारदार यांची फसवणुकीबाबतचे ट्रान्झॅक्शन तात्काळ रद्द करुन फसवणुक झालेली **एकुण** ७०,८१७/- रु रक्कम तक्रारदार यांचे क्रेडिट कार्डावर परत जमा केलेली आहे.

सायबर गुन्हे कक्ष यांचेकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, बँक खाते/क्रेडिट कार्ड यांचे नावाने कॉल करुन बनावट मोबाईल धारक आपल्याकडुन बँक खाते/क्रेडिट कार्ड Reward Point जमा करण्याचे सांगुन आपणांकडुन आपले खात्याची अगर क्रेडिट कार्डाची माहिती घेवुन आपल्या खात्यातुन रक्कम काढुन घेतात. त्यावर नागरीकांना सतर्क राहुन आपल्या बँक खाते/ क्रेडिट कार्डाची गोपनीय माहिती कोणास शेयर करु नये. सदरचे फसवणुकीचे प्रकारात वाढ होत असुन नागरीकांना स्वतः देखील सतर्क राहणे गरजेचे आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजितकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल, श्री.प्रसाद शेनोळकर, पोउनि/सायबर क्राईम सेल, मपोशि/सुवर्णा माळी, सायबर क्राईम सेल, मपोशि/ माधुरी धिंडे, सायबर क्राईम सेल यांनी केली असुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम ७०,८१७/- रु पुर्ण रक्कम त्यांना परत करण्यात आली आहे.

----